मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडमध्ये पाणीकपात लागू

## अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे 18 दिवसांत 487 तक्रारी, अनियमित, अपुरे आणि कमी दाबाने पाणी येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील साडेसहा वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जात असलेल्या पिंपरी-चिंचवडकरांवर आणखी पाणीकपातीचे संकट ओढावले आहे. पावसाला झालेल्या विलंबामुळे आणि पवना धरणातील साठा १९ टक्क्यांवर आल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यात आणखी १५ टक्के कपात करण्याचा निर्णय शुक्रवारपासून लागू करण्यात आला. पवना धरणातून ५५० ऐवजी ४७५ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी महापालिकेला दिवसाला मिळणार असल्याने पाण्याच्या वेळांमध्ये कपात केली आहे. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.




शहरात २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. अनियमित, अपुरे आणि कमी दाबाने पाणी येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. असे असतानाच यंदा पावसाने ओढ दिल्याने पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊन १९ टक्क्यांवर आला आहे. या पार्श्वभूमीवर पाटबंधारे विभागाने १५ टक्के आणखी पाणीकपात करण्याचे आदेश महापालिकेला दिले होते. त्यानुसार महापालिकेने अंमलबजावणी सुरू केली आहे.

सध्या पवना धरणातून महापालिका ५५० एमएलडी पाणी उचलते. त्यामध्ये आता कपात करून ४७५ एमएलडी पाणी मिळणार आहे. आंद्रा धरण आणि 'एमआयडीसी' कडून घेण्यात येणाऱ्या पाण्यामध्येही १५ टक्के कपात होणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले. दरम्यान, भविष्यात पाण्याच्या तक्रारी वाढल्यानंतर वेळप्रसंगी शहरातील खासगी बोअरवेल आणि विहिरी ताब्यात घेण्याचा प्रशासनाचा विचार आहे.

पाणीकपात १५ टक्के करण्यात आली आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा. वाहन धुणे, बागांना अतिरिक्त पाणी देणे, नळ विनाकारण सुरू ठेवणे यांसारख्या बाबी टाळून पाणी बचत करावी, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

### नवीन नळजोडास मनाई

» जलतरण तलावासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर पूर्णतः बंद, गृहनिर्माण संस्थांनी उद्याने, वाहने धुण्यासाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करावा, पाणी कपातीच्या कालावधीत नवीन नळजोडणी देण्यात येणार नाहीत. व्यावसायिक आस्थापना, बांधकाम प्रकल्प व इतर बिगर घरगुती वापरकर्त्यांनी आवश्यक पाण्याची व्यवस्था करावी. पाण्याचा गैरवापर आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी महापालिकेमार्फत प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय विशेष तपासणी पथके नियुक्त करण्यात येणार आहेत.

### १८ दिवसांत ४८७ तक्रारी

» शहरात सातत्याने अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या वारंवार तक्रारी येत आहेत. मागील १८ दिवसांत विस्कळीत, अपुऱ्या पाणीपुरववठ्याच्या ४८७ तक्रारी सारथी हेल्पलाइनवर आल्या आहेत. यामधील ६२ तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून, ४२५ प्रलंबित आहेत.

---

# पिंपरी-चिंचवडमधील 650 शाळांना फायर सर्टिफिकेटसाठी नोटीस

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन विभागाचा मोठा निर्णय; फायर ऑडिट व सुरक्षा उपाय बंधनकारक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शाळांची अग्निसुरक्षा नोंदणी आणि अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र (फायर सर्टिफिकेट) बंधनकारक आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांनी फायर सर्टिफिकेट घेण्याकडे दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तब्बल 650 शाळा आणि शैक्षणिक संस्थांना फायर सर्टिफिकेट घेण्यासाठी नोटीस बजावली आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करून दहा दिवसांत फायर सर्टिफिकेट घेण्याचे सूचित करण्यात आले आहे.



शहरात 540 खासगी तर, 110 महापालिकेच्या अशा एकूण 650 शाळा आहेत. उन्हाळ्याची सुटी संपून 15 जूनपासून शाळा सुरू झाल्या आहेत. तर, काही इंग्रजी माध्यमाच्या शाळा पूर्वीच सुरू झाल्या आहेत. शाळांमध्ये विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अग्निसुरक्षा उपाय असणे गरजेचे आहे.

महापालिकेच्या नियमानुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेकडे अग्निशमन विभागाचे फायर सर्टिफिकेट असणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व शाळांना अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. सर्व शाळांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करणे, त्या कार्यान्वित ठेवणे हे संस्थाचालकांची जबाबदारी आहे.

### अग्निशमन यंत्रणा असणे आवश्यक

» शाळा इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा सुरू आहे का ? याबाबत शासन मान्य संस्थेकडून फायर ऑडिट करून घेण्यात यावे. ऑडिटमध्ये काही आक्षेप निघाल्यास त्याची पूर्तता करावी. फायर ऑडिटचा अहवाल महापालिकेस सादर करावा. शैक्षणिक संस्थेची नोंदणी व आवश्यक सुरक्षा अग्नी सुरक्षितता उपाययोजना केल्यास गंभीर दुर्घटना टाळण्यास मोठी मदत होणार आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या प्रलंबित महसूल व वनविभागीय प्रश्नांवर महसूल मंत्र्यांची बैठक!

## मुंबई येथे मंत्रालयात 22 जूनला विविध कामांचा आढावा, भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश



> "पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाशी संबंधित महसूल, वन विभाग, भूमी अभिलेख आणि गावठाण हद्दीतील अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. या प्रश्नांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून अनेक विकासकामेही रखडली आहेत. त्यामुळे शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून संबंधित सर्व विभागांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनखाली आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या बैठकीत विविध विभाग एकाच व्यासपीठावर येत असल्याने अनेक प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय होतील, असा विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाशी संबंधित महसूल, वन विभाग, भूमी अभिलेख तसेच गावठाण हद्दीतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना अखेर गती मिळणार आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी मंत्रालयात दोन महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठका आयोजित करण्यात आल्या असून, या बैठकीत शहरातील विविध प्रलंबित विषयांवर सविस्तर आढावा घेऊन आवश्यक निर्णय घेतले जाणार आहेत. या बैठका भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आयोजित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार सकाळी ११.०० वाजता महसूल व वन विभागाशी संबंधित विषयांवर बैठक होणार आहे. या बैठकीत पिंपरी-चिंचवड शहरातील वनविभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न, तसेच हिंजवडी ते नवी सांगवी नदी सुधार प्रकल्पाच्या अनुषंगाने खडकी, डुडुळगाव, चऱ्होली बुद्रुक आणि तळवडे येथील गावठाण हद्दीतील प्रश्नांवर चर्चा होणार आहे. यानंतर सायंकाळी ५.०० वाजता महसूल विभागाच्या बैठकीत भूमी अभिलेख विभागातील पिंपरी-चिंचवड नवनगर कार्यालयाशी संबंधित प्रकरणे, तसेच खडकी, डुडुळगाव, चऱ्होली बुद्रुक, चोवीसावाडी आणि तळवडे गावांच्या गावठाण हद्दीतील विविध प्रलंबित विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

दोन्ही बैठकींना आमदार महेश लांडगे यांच्यासह महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव, विशेष कार्य अधिकारी, पुणे विभागीय आयुक्त, वन सचिव, भूमी अभिलेख विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी पुणे, निवासी उपजिल्हाधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सर्व विभागांना आवश्यक माहिती, अद्ययावत अहवाल आणि प्रलंबित प्रकरणांचा तपशील घेऊन उपस्थित राहण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक विकास प्रकल्प विविध विभागांच्या मंजुरीअभावी किंवा प्रशासकीय प्रक्रियेमुळे रखडले आहेत. विशेषतः वन विभाग, महसूल विभाग, भूमी अभिलेख, गावठाण हद्दी, नदी सुधार प्रकल्प आणि विविध विकास आराखड्यांशी संबंधित विषयांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. हे सर्व प्रश्न एकाच व्यासपीठावर मांडून निर्णय प्रक्रियेला गती मिळावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत प्रत्येक विषयाचा विभागनिहाय आढावा घेऊन प्रलंबित मंजुरी, प्रशासकीय अडथळे आणि आवश्यक कार्यवाहीबाबत स्पष्ट निर्देश देण्यात येणार आहेत. तसेच विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय निर्माण करून रखडलेल्या विकासकामांना गती देण्यावर भर दिला जाणार आहे. या बैठकीनंतर शहरातील अनेक महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# भाजपाचे कार्य शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे

## पदाधिकाऱ्यांना आवाहन : नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान



> "भाजप हा कार्यकर्त्यांच्या बळावर उभा असलेला सर्वसमावेशक पक्ष आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना संघटनेत जबाबदारी देऊन समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पक्षाची विचारधारा आणि केंद्र-राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना पोहोचविण्याचा आमचा संकल्प आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी संघटन विस्तार आणि जनसेवा हेच ध्येय ठेवून जोमाने कामाला लागावे."
>
> **- शत्रुघ्न (बापू) काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या विविध प्रकोष्ठांच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करून संघटन बळकटीकरणाचा निर्धार व्यक्त करण्यात आला. मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यकारिणी नियुक्ती प्रदान समारंभात भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत पक्षाचे कार्य समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

चिंचवड विधानसभा मतदार संघाचे आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात वैद्यकीय प्रकोष्ठ, अभियांत्रिकी प्रकोष्ठ, ओबीसी मोर्चा, वक्तृत्व प्रशिक्षण प्रकोष्ठ आणि दिव्यांग सेलच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, "भाजप हा सर्वसमावेशक आणि कार्यकर्त्यांच्या बळावर उभा असलेला पक्ष आहे. नव्याने नियुक्त झालेल्या प्रकोष्ठांमध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना संधी देण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना आणि भाजपची विचारधारा पिंपरी-चिंचवडमधील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल, असा मला विश्वास आहे. आगामी काळात संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी समर्पित भावनेने काम करावे."

काटे यांच्या हस्ते आणि आमदार शंकरशेठ जगताप यांच्या उपस्थितीत चेतन भुजबळ (अध्यक्ष, ओबीसी मोर्चा), डॉ. अमित नेमाने (अध्यक्ष, वैद्यकीय प्रकोष्ठ), संतोष भालेराव (अध्यक्ष, अभियंता प्रकोष्ठ), हरीश आप्पा मोरे (संयोजक, वक्तृत्व प्रशिक्षण प्रकोष्ठ) आणि अंकुश शिर्के (अध्यक्ष, दिव्यांग सेल) यांना नियुक्तीपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली भाजपची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध आघाड्या आणि प्रकोष्ठांना सक्रिय करण्याचा प्रयत्न सुरू असून, या नियुक्त्या त्याच दिशेने महत्त्वाचे पाऊल मानल्या जात आहेत.

कार्यक्रमास संघटन सरचिटणीस मोरेश्वरभाऊ शेडगे, सरचिटणीस मधुकरभाऊ बच्चे, सरचिटणीस वैशालीताई खाडये, वरिष्ठ उपाध्यक्ष संजयभाऊ पटनी, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेशभाऊ यादव, अनुपदादा मोरे, राजूभाऊ दुर्गे यांच्यासह भाजपचे अनेक ज्येष्ठ नेते, आजी-माजी नगरसेवक, विविध आघाड्यांचे प्रमुख, मंडल अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दूषित पाणी, कमी दाबाच्या तक्रारींवर महापालिकेचे 'मिशन मोड'

## दत्तवाडी, कोंढवा, हडपसर, कात्रजसह अनेक भागांतील पाणीपुरवठा समस्यांवर आयुक्तांचे निर्देश; 20 कोटींच्या कामांना वेग

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक भागांमध्ये कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, नळातून येणारे दूषित पाणी आणि कालबाह्य झालेल्या पाणीपुरवठा यंत्रणेमुळे नागरिकांच्या तक्रारी पुन्हा वाढू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने पाणीपुरवठा व्यवस्थेच्या सुधारणेसाठी पुन्हा 'मिशन मोड'मध्ये काम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आयुक्त नवल किशोर राम यांनी दत्तवाडी, राजेंद्रनगर कॉलनी आणि परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून तात्पुरत्या उपायांऐवजी कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले.

दत्तवाडी आणि राजेंद्रनगर भागांत अनेक दिवसांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून, काही ठिकाणी नळातून घाण पाणी येत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. हीच समस्या कोंढवा, हडपसर आणि कात्रज परिसरातही समोर आल्याने या भागांतही तातडीने तांत्रिक उपाययोजना राबविण्याचे आदेश देण्यात आलेत. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अपूर्ण राहिलेली कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली.



### दूषित पाण्याच्या समस्येवर २० कोटींची उपाययोजना

**» शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी महापालिकेने २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून जीर्ण जलवाहिन्यांची दुरुस्ती, नवीन पाइपलाइन टाकणे आणि ड्रेनेज व पाणीपुरवठा यंत्रणांमधील सुरक्षित अंतर राखण्याची कामे केली जाणार आहेत. काही भागांमध्ये अद्याप तक्रारी कायम असल्याने उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये यासाठी नियमित तपासणी, पाण्याचे नमुने परीक्षण आणि तांत्रिक सर्वेक्षण सुरू ठेवण्यात येणार असून सुरक्षित पाणीपुरवठ्यावर भर दिला जाणार आहे.**

पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळत असल्याच्या तक्रारीनंतर महापालिकेने शहरात विशेष सर्वेक्षण केले होते. मध्य प्रदेशातील इंदोर आणि गुजरातमधील काही शहरांमध्ये दूषित पाण्यामुळे घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम राबवली होती. या सर्वेक्षणात कोंढवा, शिवनेरीनगर, भाग्योदय नगर, हडपसर, संतोषनगर, अंजनीनगर आणि कात्रज परिसरातील काही ठिकाणी पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी मिसळत असल्याचे आढळून आले.

तपासणीत जुन्या वस्त्यांमधील पाणीपुरवठा आणि ड्रेनेज यंत्रणा जीर्ण झाल्याचे स्पष्ट झाले. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइन्स आणि ड्रेनेज लाइन्स एकाच पातळीवर अगदी जवळ टाकण्यात आल्याने गळती झाल्यास सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत असल्याचे निर्दशनास आले.

### महापालिकेचे 'मिशन मोड'

**» पुणे शहरातील कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, दूषित पाणी आणि जुन्या पाणीपुरवठा यंत्रणांमुळे वाढलेल्या तक्रारींची दखल घेत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी संबंधित भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. दत्तवाडी, राजेंद्रनगर कॉलनी आणि परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांनी अधिकाऱ्यांना तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे निर्देश दिले. पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण यंत्रणांमधील त्रुटी दूर करण्यासाठी 'मिशन मोड'मध्ये काम करण्यावर भर देण्यात आला आहे. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

### पाणीपुरवठा विभागाकडून विशेष मोहीम


**» समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अपूर्ण राहिलेली कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी विभागाकडून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली. कोंढवा, हडपसर, कात्रज, शिवनेरीनगर, भाग्योदयनगर आणि संतोषनगर परिसरात पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळत असल्याच्या तक्रारींची तपासणी करण्यात आली. अनेक ठिकाणी जुन्या जलवाहिन्या आणि ड्रेनेज लाईन्स जीर्ण झाल्याचे तसेच दोन्ही लाईन्स जवळ असल्याने दूषित पाणी मिसळण्याचा धोका वाढल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तांत्रिक सुधारणा आणि दुरुस्तीची कामे वेगाने सुरू करण्यात आली आहेत.**

# नीट' परीक्षेसाठी पुण्यात कडेकोट बंदोबस्त; प्रत्येक केंद्रावर 20 पोलीस कर्मचाऱ्यांचा पहारा

## पुणे शहर आणि जिल्ह्यातील 63 केंद्रांवर होणार 'नीट' परीक्षा; सुरक्षेच्या पाश्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केंद्रांची पाहणी पूर्ण.

**पुणे | प्रतिनिधी**

पेपरफुटीच्या घटनांमुळे देशभरात चर्चेत आलेली राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट-यूजी) २१ जून रोजी पुन्हा आयोजित करण्यात येणार आहे. परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुरळीत वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी पुणे शहर आणि जिल्ह्यात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर सुमारे २० पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.



पुणे जिल्ह्यात ३६, तर शहरात २७ परीक्षा केंद्रांवर नीट परीक्षा होणार आहे. या सर्व केंद्रांची पाहणी संबंधित पोलीस उपायुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी केली असून, सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा ठेवण्यात येणार असून, संपूर्ण प्रक्रियेचे रेकॉर्डिंगही केले जाणार आहे. मागील काही स्पर्धा परीक्षांमध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना समोर आल्याने यंदा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

संशयास्पद हालचाली, अफवा किंवा पेपरफुटीशी संबंधित संदेशांवर सायबर पोलिसांकडून बारकाईने नजर ठेवली जाणार आहे. परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस मदतीच्या भूमिकेत राहणार आहेत. पार्किंग व्यवस्थेपासून परीक्षा केंद्रापर्यंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी पोलीस कर्मचारी पार पाडणार आहेत. याशिवाय परीक्षा केंद्र परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

### सुरक्षा व मदतीला प्राधान्य

**» विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांना सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षण देण्यात आले असून, विद्यार्थी आणि पालकांशी संवेदनशीलतेने व सहकार्याच्या भावनेतून वागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्रांवर सुरक्षा आणि मदत या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले जाणार असल्याचे कुमार यांनी सांगितले.**

# पुणे जिल्ह्यात पाणी तळाला; गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल 90 टीएमसी पाणी कमी

## पुणे विभागात यंदा अत्यंत चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली असून गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल 90.9 टीएमसी पाण्याची तूट समोर आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विभागातील धरणांमधील उपयुक्त जलसाठा ७७ अब्ज घनफूट (टीएमसी) असून गतवर्षीच्या १६९.९ टीएमसी (३१.१६ टक्के) च्या तुलनेत सुमारे ९०.९ टीएमसी इतकी तूट असल्याची माहिती पाणी नियोजनासंदर्भातील बैठकीत देण्यात आली. दरम्यान, धरणे, कालवे, नद्या तसेच अन्य जलस्रोतांमधील अनधिकृत आणि बेकायदा पाणीउपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबवावी, असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी गुरुवारी दिले.

पर्जन्यमान विश्लेषण, धरणातील पाणीसाठ्याचा आणि पाणीवापराचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत गुरुवारी आढावा घेतला. त्या वेळी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून तुटीची माहिती देण्यात आली. पुणे पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते, कार्यकारी अभियंता राजेंद्र डुबल, अधीक्षक अभियंता किरण देशमुख यांच्यासह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

'खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण साखळी प्रकल्पाची जिवंत साठा क्षमता २९.१५ टीएमसी असून ४.१३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. तसेच, पवना धरणामध्ये १.६५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरासाठी ऑगस्टअखेरपर्यंत अंदाजित अनुक्रमे ४ आणि दीड टीएमसी पिण्याच्या पाण्याच्या गरजेनुसार योग्य नियोजन करावे,' अशी सूचना डुडी यांनी केली.



### जलसंपदा विभागाची भूमिका

» पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी जलसंपदा विभागाला विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. जलाशय प्रचलन-संवर्धन धोरण अवलंबून धरणांचे संचालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उपलब्ध पाणीसाठ्याचा कार्यक्षम वापर, साप्ताहिक आढावा आणि गरजेनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे. अनधिकृत मोटारी, पाईपलाईन आणि पंपाद्वारे होणारा बेकायदा पाणीउपसा रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आल्या आहेत.

### सर्व विभागांना सतर्कतेचे आदेश

» पुणे विभागातील धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या मर्यादित पाणीसाठ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सर्व विभागांना सतर्कतेचे आदेश दिले आहेत. खडकवासला धरणसाखळीत ४.१३ टीएमसी आणि पवना धरणात १.६५ टीएमसी पाणी शिल्लक असल्याने त्याचे काटेकोर नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत महापालिका, ग्रामपंचायती, एमआयडीसी आणि इतर यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच धरणे, नद्या आणि कालव्यांमधील बेकायदा पाणीउपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांकडून विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

### काटकसरीने पाणी वापरण्याचे आवाहन

» पुणे विभागातील जलसाठ्याची सद्यस्थिती चिंताजनक असल्याची माहिती अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे यांनी बैठकीत दिली. सध्या विभागातील उपयुक्त जलसाठा ७७ टीएमसी इतका असून, गतवर्षीच्या तुलनेत तब्बल ९०.९ टीएमसीची तूट निर्माण झाली आहे. एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे अनिश्चित चित्र लक्षात घेता जलसंपत्तीचे संवर्धन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. धरणांमधील आवक, पर्जन्यमान आणि पाणीवापराचा नियमित आढावा घेत परिस्थितीनुसार नियोजन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. जलसाठ्यावरील वाढता ताण लक्षात घेऊन काटकसरीने पाणी वापरण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# पुणे मेट्रो-पीएमपी तिकीट इंटिग्रेशनला वेग; एकाच तिकिटावर प्रवास शक्य

## प्रवाशांसाठी मोठी सुविधा; मेट्रो आणि बस सेवा एकत्र येणार, वेळ व खर्चात बचत

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमपी आणि पुणे मेट्रो यांच्यातील तिकीट इंटिग्रेशनचे (एकत्रित तिकीट प्रणाली) काम आता वेगाने सुरू झाले आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना एकाच तिकिटावर किंवा पासवर मेट्रो आणि पीएमपी बसने प्रवास करणे शक्य होणार आहे.

पीएमपी आणि मेट्रोच्या या प्रणालीला गती देण्यासाठी नुकतीच पीएमपीएमएल आणि या कामासाठी नियुक्त केलेल्या एका विशेष कंपनीची उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत दोन्ही वाहतूक यंत्रणा एकमेकांशी कशा प्रकारे जोडल्या जाऊ शकतात, यावर सविस्तर चर्चा झाली. तिकीट इंटिग्रेशनचे काम तांत्रिक व व्यावहारिकदृष्ट्या यशस्वी करण्यासाठी एका तज्ज्ञ कंपनीची नेमणूक केली आहे.

ही कंपनी संपूर्ण प्रणालीचा सखोल अभ्यास करेल. प्रवाशांच्या आणि पीएमपी, मेट्रोच्या सोयीनुसार सर्वोत्तम पर्याय शोधेल. त्याच्या अभ्यासाअंती आपला सविस्तर अहवाल पीएमपीएमएल प्रशासनाकडे सादर करेल. नियुक्त केलेली कंपनी सध्या या प्रकल्पाचा सखोल अभ्यास करत आहे. त्यांनी येत्या आठ दिवसांत अहवाल सादर केल्यानंतरच पुढील अंतिम कार्यवाही सुरू होणार आहे.



> पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर करणे, हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. मेट्रो आणि पीएमपी सेवा एकमेकांना जोडल्या गेल्याने प्रवाशांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाचणार आहे. सध्या नियुक्त केलेल्या कंपनीमार्फत या एकत्रित तिकीट प्रणालीकरिता तांत्रिक आणि व्यावहारिक बाबींचा सखोल अभ्यास सुरू आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, दोन्ही यंत्रणांच्या तिकीट प्रणालीचे एकत्रीकरण करून एकच तिकीट किंवा क्यूआर कोड असलेला पास ही संकल्पना आम्ही प्राधान्याने आणि अत्यंत वेगाने प्रत्यक्षात आणणार आहोत.
>
> **- महेश आव्हाड, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

**प्रवाशांना फायदा?**

एकच तिकीट, दुहेरी प्रवास होणार आहे. मेट्रोतून उतरून पीएमपी बस पकडताना किंवा उलट प्रवास करताना वारंवार वेगवेगळ्या रांगेत उभे राहून तिकीट काढण्याची गरज पडणार नाही.

वेळेची आणि पैशांची बचत होणार आहे. तिकीट प्रणाली एकत्र आल्याने प्रवाशांचा वेळ वाचेल आणि प्रवास अधिक गतिमान होईल.

सार्वजनिक वाहतुकीला चालना देण्यासाठी या एकात्मिक प्रणालीमुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

अहवाल प्राप्त झाल्यानंतर या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी सुरू होते, याकडे आता पुणेकरांचे लक्ष लागले.